www. sahyandrinews.com
दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
Scan QR code to visit ... Epaper Portal
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक ८७ • Title - Code :- MAHMAR49513 • गुरुवार दि.२१ डिसेंबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# आयपीसी ५११ कलमांच्या जागी आता ३५८

## ३ न्यायिक विधेयके मंजूर; गुलामीच्या मानसिकतेतून बाहेर काढणार-शाह

**नवी दिल्ली-**तीन नवीन गुन्हेगारीविषयक विधेयके बुधवारी लोकसभेत मंजूर झाली. निलंबनामुळे विरोधी पक्षातील ९७ खासदार संसदत हजर राहू शकले नाही. विधेयकांमध्ये भारतीय न्यायसंहिता-२०२३, भारतीय नागरिक सुरक्षा विधेयक-२०२३ व भारतीय साक्ष विधेयक-२०२३ चा समावेश आहे. ही विधेयके भारतीय दंड संहिता-१८६०, दंड प्रक्रिया संहिता अधिनियम-१८९८ व भारतीय साक्ष अधिनियम १८७२ ची जागा घेतील. भारतीय न्याय संहितेत आयपीसीच्या ५११ कलमांची जागा ३५८ कलमे घेतील. विधेयकांवरील चर्चेला उत्तर देताना गृहमंत्री अमित शाह म्हणाले, केंद्र सरकारने तिन्ही गुन्हेगारीविषयक कायद्यांना गुलामीच्या मानसिकतेतून मुक्त केले आहे. त्यात न्याय, समानता, नि:पक्षतेला समाविष्ट करण्यात आले आहे. १५० वर्षांपूर्वीच्या इंग्रजांच्या काळातील कायद्यात बदल करण्यात आला आहे. या मसुद्यांना मंजुरी मिळाल्यानंतर देशभरात एकाच प्रकारची न्यायप्रणाली लागू होईल. न्यायप्रणालीत समानता येईल. शाह यांनी नामोल्लेख न करता काँग्रेसवर टीका केली. ते म्हणाले, मन इटलीचे असल्यास कायदा समजणार नाही, मन येथील असल्यास कायदा समजेल. पूर्वीच्या कायद्यांचे ब्रिटिश सत्तेला प्राधान्य होते. मात्र आता मानव सुरक्षा, देशाच्या सुरक्षेला महत्त्व आहे.शाह म्हणाले, राजद्रोहाला देशद्रोहात रूपांतरित करत आहोत. 'राजद्रोहाच्या जागी



देशद्रोह केले. सरकारवर टीका करता येते. परंतु देशाची मालमत्ता, सुरक्षेला धोका पोहोचवल्यास शिक्षा होईल.भारतीय न्यायिक संहिता: आता २० नवीन गुन्ह्यांची भर पडली आहे. ३३ गुन्ह्यांत तुरुंगवासाची शिक्षा वाढवली. ८३ गुन्ह्यांमध्ये दंड आणि शिक्षेच्या प्रमाणात वाढ केली आहे. २३ गुन्ह्यांमध्ये किमान शिक्षेची तरतूद. ६ गुन्ह्यांमध्ये समाजसेवेची शिक्षा असेल. १९ कलमे हटवण्यात आली.यात १७० कलमे असतील (मूळ १६७ कलमे). एकूण २४ कलमे बदलले आहेत. दोन नवीन कलमे, सहा उपकलमे जोडली गेली आहेत. सहा कलमे रद्द अथवा हटवले गेले आहेत.भारतीय५३१ कलमे असतील (हे सीआरपीसीच्या ४८४ विभागांची जागा घेतील). एकूण १७७ तरतुदी बदलल्या. ९ नवीन कलमे, ३९ नवीन उपकलमे जोडली आहेत.४४ नवीन तरतुदी आणि स्पष्टीकरणे जोडले.३५ कलमांत टाइमलाइन. ३५ ठिकाणी ऑडिओ-व्हिडीओ. १४ कलमे काढली.लैंगिक गुन्ह्यांच्या निपटाऱ्यासाठी न्यायिक संहितेने 'महिला आणि मुलांविरुद्ध गुन्हे' नावाचा नवीन अध्याय सुरू केला. त्यात १८ वर्षांखालील मुलींवरील अत्याचाराशी संबंधित तरतुदीत बदल करण्याचा प्रस्ताव आहे. अल्पवयीनावरील सामूहिक अत्याचाराचा संबंध पॉक्सोशी जोडला. अल्पवयीन बाबतीत जन्मठेप किंवा फाशीच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

## आश्रम शाळेतील विद्यार्थिनींना जेवणातून विषबाधा

**गडचिरोली । प्रतिनिधी**

शासकीय आश्रम शाळेतील विद्यार्थिनींना जेवणातून विषबाधा झाल्याची घटना धानोरा तालुक्यातील सोडे येथे घडली आहे. जवळपास १०० विद्यार्थिनींना विषबाधा झाल्याने त्यांना उपचारासाठी धानोरा येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यापैकी काही विद्यार्थिनींची प्रकृती चिंताजनक असून त्यांना जिल्हा सामान्य रुग्णालय गडचिरोली येथे उपचारार्थ हलविल्याची माहिती समोर येत आहे.

धानोरा तालुक्यातील सोडे या गावात एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प गडचिरोलीच्या माध्यमातून शासकीय मुलींची आश्रम शाळा चालविली जाते.याठिकाणी केवळ मुलींसाठी आश्रम शाळा असून धानोरा तालुक्यातील दुर्गम व अतिदुर्गम भागातील जवळपास ३८० आदिवासी मुली निवासी स्वरूपात शिक्षण घेतात.बुधवार (२० डिसेंबर) रोजी नेहमीप्रमाणे सर्व विद्यार्थिनींना दुपारच्या सुमारास जेवण देण्यात आले. आलू,गोबी,वरण भात याचं भोजन केल्यानंतर काही वेळाने विद्यार्थिनींच्या पोटात दुखने, काहींना चक्कर येणे तर मळमळ वाटणे सुरू झाले. याची तक्रार विद्यार्थिनींनी शाळेच्या शिक्षकांकडे केली.लगेच येथील मुख्याध्यापक



आणि शिक्षकांनी रुग्णवाहिका बोलावून तब्बल १०० पेक्षा अधिक विद्यार्थिनींना धानोरा तालुका मुख्यालयात असलेल्या ग्रामीण रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले.याची माहिती मिळताच प्रकल्प अधिकारी, सहाय्यक प्रकल्प अधिकारी यांनी धानोरा येथे धाव घेतली.त्यातील काही विद्यार्थिनिंची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना जिल्हा मुख्यालयात उपचारासाठी पाठविण्यात आल्याची माहिती आहे.सोडे येथील शासकीय आश्रम शाळेतील विद्यार्थिनींची प्रकृआश्रम शाळेतील विद्यार्थिनींना जेवणातून विषबाधार्ती अचानक बिघडल्याने तब्बल ९१ विद्यार्थिनींना धानोरा ग्रामीण रुग्णालयात उपचारार्थ हलविले असून सध्या प्रकृर्ती स्थिर असल्याची माहिती येथील सहाय्यक प्रकल्प अधिकारी अनिल सोमणकर यांनी दिली आहे.

## एकविसाव्या शतकात पुणे पुस्तक महोत्सवसारखे उपक्रम महत्वाचे : सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार

**पुणे । प्रतिनिधी**

एकविसाव्या शतकात डिजिटल माध्यमांचा प्रसार वेगाने होत असताना नव्या पिढीत वाचनसंस्कृती रुजविण्यासाठी पुणे पुस्तक महोत्सवासारखे उपक्रम महत्त्वपूर्ण असल्याचे प्रतिपादन राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

नॅशनल बुक ट्रस्टच्या सहकार्याने पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालय येथे आयोजित पुणे पुस्तक महोत्सवाला सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी मंगळवारी रात्री भेट दिली, त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी पुणे पुस्तक महोत्सवाचे मुख्य संयोजक आणि भाजपा प्रदेश उपाध्यक्ष राजेश पांडे, पुणे विद्यापीठ अधिसभा सदस्य प्रसेनजीत फडणवीस, भाजपा पुणे शहर अध्यक्ष धीरज घाटे, राज्य मराठी विकास संस्थेचे माजी प्रभारी संचालक प्रा. आनंद काटीकर आदी उपस्थित होते. ना.सुधीर मुनगंटीवार यांनी पुणे पुस्तक महोत्सव हा स्तुत्य



उपक्रम असल्याचे सांगून या भव्य आयोजनाबद्दल राजेश पांडे यांचे कौतुक केले. त्यांनीपांडे यांच्याकडून महोत्सवात झालेल्या गिनीज विश्वविक्रमाचीही माहिती घेतली. विविध विषयांचे ज्ञान प्राप्त करण्यासाठी पुस्तके मार्गदर्शक ठरतात आणि मुलांना पुस्तकापर्यंत पोहोचविण्यासाठी पुस्तक महोत्सवासारखे आयोजन महत्वाचे आहे, असे नमूद करून त्यांनी संयोजनात सहभागी व्यक्ती आणि संस्थांचे अभिनंदन केले.

## गडचिरोलीत नक्षलवाद्यांचा धुमाकूळ,रस्ता कामासाठी आणलेल्या वाहनांची जाळपोळ

**गडचिरोली । प्रतिनिधी**

अतिदुर्गम व नक्षलग्रस्त भाग म्हणून ओळख असलेल्या भामरागड तालुक्यात १९ डिसेंबर (मंगळवार) रोजी रात्री नऊ वाजताच्या सुमारास माओवाद्यांनी रस्ता बांधकामासाठी आणलेल्या वाहनांची जाळपोळ केल्याची घटना घडली.ही घटना आज पहाटेच्या सुमारास उघडकीस आली.

मागील काही दिवसापासून हिदूर-दोबुर-पोयरकोटी या रस्त्याचे बांधकाम सुरू होते. दिवसभर रस्त्याचे काम झाल्यावर रात्रीच्या सुमारास हिदूर या गावात वाहने ठेवतात. दरम्यान १९ डिसेंबर रोजी रात्री नऊ वाजताच्या सुमारास जवळपास नक्षलवाद्यांनी हिदूर गावात येऊन वाहनांची जाळपोळ केली.यात तीन ट्रॅक्टर आणि एक जेसीबीचा समावेश असल्याची माहिती समोर येत असलेतरी गडचिरोलीचे पोलीस अधीक्षक निलोत्पल यांनी एक जेसीबी जाळल्याची माहिती दिली आहे.या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.नुकतेच




काही दिवसांपूर्वी २ ते ८ डिसेंबर पीएलजीए सप्ताह दरम्यान पोलिसांचे खबरी ठरवून तीन आदिवासी युवकांची हत्या करण्यात आली होती. त्यानंतर परत एकदा भामरागड तालुक्यात रस्ता बांधकामासाठी आणलेल्या वाहनांची जाळपोळ केली. यात संबंधित कंत्राटदाराचे मोठे नुकसान झाले आहे.घटनास्थळावर आढळले माओवाद्यांचे पत्रके भामरागड पोलीस स्टेशन हद्दीत असलेल्या हिदूर या गावात माओवाद्यांनी रस्ता बांधकामावरील वाहनांची जाळपोळ केल्यानंतर या परिसरात पत्रके टाकली. त्यात '२२ डिसेंबर को भारत बंद सफल बनाए' असे आवाहन त्यांनी केले.हिंदी भाषेत लिहिलेल्या पत्रकात त्यांनी विकसित भारत ढोंग असल्याचा आरोप केला आहे.

## गोंडपिपरीत अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने रेतीतस्करी...?

**गोंडपिपरीत । प्रतिनिधी**

तालुक्यातील कुलथा रेतिघाट तस्करांनी पोखरून काढला असून रात्रभर पोकलेन च्या साहाय्याने रेती काढणे सुरू असताना अधिकाऱ्यांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष दिसत आहे. तस्करांनी एकच धुमाकूळ घातला असून अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने रेती तस्करी सुरू असल्याचे बोलले जात आहे.रेती तस्करांवर आळा घालण्यासाठी महसूल विभाग फिरके पथक करत असतात परंतु सध्या ते फिरके पथक कोमात असल्याचे दिसत आहे.सोबतच वनविभागाच्या हद्दीतून सुधा मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू आहे दुसरीकडे या गोष्टीचा फायदा उचलून तस्कर जोमात दिसत आहेत.गोंडपिपरी तालुक्यात उत्तम दर्जाचा रेती साठा असून नद्यांमधून मोठ्या प्रमाणात रेती तस्करी करून दुसऱ्या राज्यात देखील रेतीची वाहतूक होताना दिसत आहे.रेती




तस्कर खुलेआम रेतीची वाहतूक करताना आढळत असून मोठे माफिया तयार झाले आहे.घाटाशेजारी हजारो ब्रास रेती साठा रात्रभरात जमा होतो अचानक गायब होतो.पुन्हा आढवडा भरात रेतीचे ढिगारे जसेच्या तसे दिसत असतात.अनेक माणसे घाटापासून ते गोंडपिपरी पर्यंत अधिकाऱ्यांवर नजर ठेवले असतात. कुलथा घाटाकडे सामान्य नागरिक शेताकडे जाताना आढळल्यास त्यांना घेराव घालून चौकशी करतात व सोडतात त्यामुळे सामान्य नागरिक भयभीत असून रात्रीच्या वाहतुकीमुळे घाटाशेजारील गावकऱ्यांची झोप मोड होत असून झोपी गेलेल्या स्थानिक अधिकाऱ्यांना जाग येईल का असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केल्या जात आहे.

# चंद्रपूरसह वरोरा,मुल,पोंभुर्णा एमआयडीसी परिसरातील खाली भूखंड परत घेणार

## भूखंड वाटपाची प्रक्रिया राबविताना अगोदर स्थानिकांना प्राधान्य देणार : मंत्री उदय सामंत

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्यातील एमआयडीसी परिसरातील खाली भूखंड परत घेणार असून, नवीन लोकांना भूखंड वाटपाची प्रक्रिया राबविताना अगोदर स्थानिकांना प्राधान्य देणार असे आश्वासन उद्योग मंत्री उदय सामंत यांनी दिली.

चंद्रपूर बाजार समितीचे माजी सभापती काँग्रेसचे नेते दिनेश दादापाटील चोखारे यांनी उद्योग मंत्री उदय सामंत यांना भेटून याबाबत निवेदन दिले. यावेळी पवन अगदारी उपस्थित होते.चोखारे यांनी निवेदनात म्हटले आहे की, चंद्रपूर जिल्हा हा औद्योगिक जिल्हा म्हणून ओळखला जातो. मात्र अलिकडच्या काळात जिल्ह्याची ओळख पुसली जात आहे. जिल्ह्यातील उद्योग कमी होत आहेत. त्या तुलनेत बेरोजगारांची संख्या झपाट्याने वाढत आहे. चंद्रपूरसह वरोरा, भद्रावती, मूल, पोंभुर्णा, राजुरा, तालुक्यात उद्योगांना चालना देण्यासाठी एमआयडीसीची निर्मिती करण्यात आली आहे. एमआयडीसींचे सर्व जमिनी उद्योजकांनी अधिग्रहितही केल्या आहेत. मात्र कित्येक वर्षांपासून या जमिनीवर उद्योग उभे राहिलेले नाहीत. बहुतांश एमआयडीसी परिसर ओसपडल्याचे दिसून येत आहे.चंद्रपूर शहर उद्योगांचे शहर आहे. कोळसा खाणी, वीज केंद्र, एमईएल, असे कारखाने शहराच्या सभोवताल आहेत. तरीही जिल्ह्याचे स्थान आणि



वाढती बेरोजगारी टाळण्यासाठी शहरासाठी दाताळा मार्गावर एमआयडीसीची उभारणी करण्यात आली आहे. या एमआयडीसीतही काही उद्योग उभे झाले आहेत. मल्टीऑर्गनिक हा उद्योग सोडला तर डोळ्यात भरण्याएवढा मोठा उद्योग या परिसरामध्ये नाही. काही उद्योग एमआयडीसीत दिसत असले तरी अनेक जमिनी अद्यापही रिकाम्या आहेत.उद्योगाच्या नावावर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जागेवर स्वस्तात भूखंड मिळतात म्हणून केवळ जिल्ह्यातीलच नव्हे तर जिल्ह्याबाहेरील शेकडो लोकांनी विविध एमआयडीसीत भूखंड घेतले. आश्चर्याची गोष्ट अशी की या भूखंडधारकांचा उद्योग भूखंड बुक करण्यापलिकडे पुढे सरकलाच नाही. आज जर कोणीही अशा एमआयडीसीचा फेरफटका मारला तर उजाड माळरानापलिकडे या एमआयडीसीत काहीच दिसून येत नाही.शासनाला विविध शहरातील एमआयडीसीची खरोखरच प्रगती बघायची असेल तर ज्यांनी ज्यांनी येथील भूखंड बुक केले आहेत, त्यांच्याकडून अगोदर हे भूखंड परत घेण्याची प्रक्रिया सुरू करावी. भूखंड परत घेतल्यानंतर नवीन लोकांना भूखंड वाटपाची प्रक्रिया राबविताना अगोदर स्थानिकांना प्राधान्यक्रम द्यावा अशी विनंती चोखारे यांनी केली.या विनंतीवर बोलताना उद्योग मंत्री उदयजी सामंत म्हणाले की, योग्य ती चौकशी करून स्थानिकांना प्राधान्य देऊ असे आश्वासन दिले. यावेळी सविस्तर चर्चा झाली.

## संपादकीय

# धारेवर धारावी!

मुंबई नव्हे; तर आशिया खंडातील सर्वांत मोठी झोपडपट्टी अशा लौकिकाने गाजलेली धारावी सध्या पुनर्विकासाच्या मुद्द्यावरून चांगलीच चर्चेत आहे. शिवसेनेच्या एका गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी धारावीकरांच्या अधिकारांसाठी मोर्चा काढून या प्रश्नाला आणखी धार लावली आहे.राजकारणाच्या संघर्षात अडकलेल्या प्रश्नांचे अनेकदा इतके सुलभीकरण केले जाते, की जणू काही अमूक व्यक्ती वा पक्ष सत्तेवरून जाऊन तमूक व्यक्ती वा पक्ष आली की प्रश्न सुटेल. प्रत्यक्षात तसे होत नसते, याचे धारावी हे उत्कृष्ट उदाहरण. पासष्ट गिरण्या असलेल्या मुंबापुरीची 'गिरणगाव' ही ओळख कामगारांच्या प्रदीर्घ संपानंतर गमावली गेली.आता काही पडीक चिमण्या आणि मिलच्या जमिनीवर उभ्या राहिलेल्या मॉलमध्ये काम करणारी गिरणी कामगारांची मुले एवढीच ओळख सध्या उरली आहे. नाही म्हणायला गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न अजून प्रलंबित असल्याने तो अधूनमधून उचल खातो. गिरण्यांची सद्दी संपल्यानंतर मुंबईच्या मोकळ्या जागांवर उंचच उंच इमारती उभ्या राहिल्या आणि मुंबईदेखील उंचावरून दुबई, सिंगापूरसारखी भासू लागली.पण तिच्या या सौंदर्यात 'धारावी' मात्र खटकत होती. मुंबईसारख्या जगभरात महागड्या शहरामध्ये मध्यवर्ती जागेवर धारावी असल्याने तिच्याकडे अनेकांचे लक्ष होतेच. एवढ्या मोठ्या परिसराचा विकास हा काही लगेच होणार नाही हेही खरेच. पण हा विकास साधायचा कसा आणि कुणाचा विकास होणार असे अनेक प्रश्न होते.धारावीच्या रूपाने अनेक मुद्दे पुढे येतात. त्यामुळेच गेली सुमारे १५-२० वर्षे त्याच्या चर्चाच सुरू आहेत. अनेक अभ्यास झाले, अनेक चर्चा झाल्या, पण विकास कसा आणि कधी होणार हे प्रश्न बराच काळ प्रलंबित राहिले होते.मुळात धारावी हा काही गृहप्रकल्प नाही. त्याच्याकडे या एकाच नजरेतून पाहिले जाते आहे का, असा प्रश्न निर्माण होतो. धारावीचा इतिहास पाहिला तर १८५० नंतर ब्रिटिश राजवट सुरू झाल्यानंतर तिचा प्रामुख्याने विकास झाला. तिथे अनेक उद्योग सुरू झाले. जसे उद्योग सुरू झाले, तशी लोकवस्ती वाढत गेली आणि याचा वेग एवढा प्रचंड होता, की स्वातंत्र्यानंतरच्या काही काळात ती सर्वाधिक मोठी झोपडपट्टी गणली गेली.देशातील सर्वांत मोठा चामड्याचा उद्योग तिथे आहे. शिवाय फरसाण, मातीची भांडी, गार्मेंट असे एक ना अनेक उद्योग तिथे आहेत. 'स्लमडॉग मिलेनियर', 'गली बॉय'सारख्या चित्रपटांतून तिथली लहान घरे, छोट्या गल्ल्या, असुविधा दिसल्या असल्या, तरी प्रत्यक्षात अनेक मोठ्या उद्योगांचे ते केंद्र आहे. तिथे घरटी काही तरी उद्योग सुरू असतो. त्यामुळे धारावीचा विकास हा एखाद्या इमारत पुनर्विकासासारखा नाही, त्याचा अनेक अंगाने विचार करावा लागणार आहे.टाटा सामाजिक संस्थेतील तज्ज्ञांनी याचा अभ्यास केला होता. त्यांच्या मते हा केवळ भौतिक विकास नाही, तो सामाजिक विकास आहे. तिथल्या व्यवसायांचा विचार प्रामुख्याने करावा लागणार आहे. सद्यःस्थितीत एक लाख निवासी घरांबरोबरच तिथे ४० हजार छोटे-मोठे व्यवसाय आणि त्यावर अवलंबून असलेली रोजीरोटी आहे. त्यामुळे हा केवळ मानव पुनर्विकास नाही, त्याकडे त्या नजरेतून पाहता कामा नये.शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी सर्वप्रथम धारावीच्या पुनर्विकासाचा प्रश्न समोर आणला होता. त्यासाठी १९९७ पासून जागतिक निविदा काढण्यात आल्या आहेत. २००४ मध्ये सिंगापूर, दुबई, अमेरिकेतील कंपन्यांनी रस दाखवला होता; मात्र या प्रकल्पाची रखडपट्टी सुरू झाली. आपल्याकडे कोणताही प्रकल्प सुरू झाला की पात्रता-अपात्रतेचा वाद सुरू होतो.त्यातच अनेकदा प्रकल्पविलंब सुरू होतात आणि त्यांची किंमत अव्वाच्या सव्वा होते. मग ते किफायशीर ठरण्याऐवजी पांढरा हत्ती ठरतात. अशाच अपात्रतेत काही काळ धारावी प्रकल्पाने गटांगळ्या खाल्ल्या आहेत. चीनमध्ये पुनर्विकास करताना जागा निश्चित करून पूर्ण वस्ती किंवा परिसर स्थलांतरित केला जातो.यात तिथे आहेत त्या सर्वांचे लागलीच पुनर्वसन होते आणि निर्णय तातडीने होत असल्याने वादाचे प्रसंग खूप कमी निर्माण होतात आणि प्रकल्प वेळेत पूर्ण होतात. धारावीच्या बाबतीत मात्र अनेक वर्षे असे विषय निघत आहेत आणि लोकांचा सरकारवर विश्वास बसत नाही. मग 'धारावी बचाव'चे नारे सुरू होतात आणि मोर्चेही निघतात. आताही सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार खडाजंगी सुरू आहे.'सेकलिंक' नावाच्या कंपनीची निविदा मंजूर झालेली असतानाही ती सरकारने रद्द का केली, याबाबत संशय व्यक्त केला जात आहे. त्यानंतर या प्रकल्पात अदानी समूहाचा प्रवेश झाला. यामुळेच धारावीकरांच्या भुवया उंचावल्या आहेत. 'सेकलिंक'ने न्यायालयात दाद मागितली आहे. सरकारनेही अदानींवर सवलतींची खैरात केल्याचा विरोधकांचा आरोप आहे. यापैकी सर्वांत मोठा आक्षेप हा 'टीडीआर'चा आहे.धारावीसारख्या मोठ्या भूखंडातून निर्माण होणारा सर्व 'टीडीआर' पूर्ण मुंबईभर वापरण्यात येणार आहे आणि इतर विकसकांना अदानींकडून विकत घ्यावा लागणार आहे. मुंबईचा असा सर्वांत मोठा भूभाग एका कंपनीच्या हाती गेल्याने धारावीचे काय होणार, असा गंभीर प्रश्न आहे.धारावी झोपडपट्टी म्हणून प्रसिद्ध असली, तरी तिच्याकडे एका व्यावसायिक संकुलासारखे पाहायला हवे. त्यातील उद्योग टिकले तर रोजगार टिकेल आणि रोजगार टिकले तर माणसे टिकतील. अशाच मानवकेंद्रित विकासाची अपेक्षा 'धारावी'ला आहे.

# मोडीत निघणारी आयुधे



संसदीय लोकशाहीत बहुमत मिळालेल्या पक्षाला देशाचा वा राज्याचा कारभार करण्याची संधी मिळते. अर्थात, या संधीला निर्णयाच्या व काळाच्या मर्यादा घालून दिलेल्या असतात. दर पाच वर्षांनी जनतेला सरकारच्या कामाची पोचपावती मतदानाच्या माध्यमातून देण्याचा अधिकार असतो. सरकार बदलण्याची ताकदही जनतेच्या हातात असते. त्यामुळे लोकशाहीत निवडून आलेले सरकार राजेशाही अथवा हुकूमशाहीप्रमाणे मनमानी निर्णय घेऊ शकत नाही. किंबहुना ते घेता नयेत, असे घटनाकारांना अभिप्रेत होते. त्यामुळेच सरकारच्या कामावर अंकुश ठेवण्याकरिता विविध संसदीय आयुधेदेखील देण्यात आली.संसद असो वा विधिमंडळ यात सरकारच्या कामावर अंकुश ठेवण्यासाठी, सरकारी योजना योग्य पद्धतीने राबवल्या जात आहेत किंवा कसे हे पाहण्यासाठी, त्यातील त्रुटी दाखवून देण्यासाठी विविध समित्या असतात. या समित्यांमध्ये सत्ताधारी आमदारांच्या बरोबरीनेच विरोधी पक्षाच्या आमदारांचेही मोठे महत्त्व असते. विशेषतः संसद वा विधिमंडळातील लोकलेखा समितीच्या अध्यक्षपदी विरोधी पक्षाचा सदस्य असतो. 'कॅग'ने म्हणजेच नियंत्रक महालेखा परीक्षकांनी दिलेल्या अहवालाची तपासणी ही समिती करत असते. सध्या राज्य विधिमंडळाच्या अशा अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या तब्बल २५ समित्यांचे कामकाजच ठप्प पडलेले आहे. हे कामकाज न होण्याचे मुख्य कारण म्हणजे शिवसेनेतील फुटीनंतर राज्यावर आलेल्या शिंदे-फडणवीस सरकारने या समित्यांच्या कामकाजाला स्थगिती दिली आहे. सरकारवर अंकुश ठेवणाऱ्या व घटनात्मक दर्जा असणाऱ्या या समित्यांना सत्ताधाऱ्यांनी स्थगिती देणे हे जितके लोकशाहीसाठी मारक आहे, त्याहीपेक्षा याचे विरोधकांना काहीही सोयरसुतक नसणे, ही लोकशाही जिवंत राहण्याच्या दृष्टीने अत्यंत गंभीर बाब आहे.सध्याच्या राजकीय वातावरणात लोकशाहीतील उणिवा, त्रुटी शोधून त्यातून व्यक्तिगत ईप्सित साध्य करणे याकडेच लोकप्रतिनिधींचा अधिकाधिक कल असल्याचे दिसून येते. त्यातूनच जनतेलाही या सगळ्याचा वीट येतो व लोकशाही व्यवस्थेवरील विश्वासाला तडा जातो. सरकारे ही नेतृत्वाच्या नावे ओळखली जाण्याच्या या काळात लोकशाही मूल्य व व्यवस्थेला मजबूत करणे हे मोठे आव्हानात्मक काम आहे. मात्र, सर्व प्रकारची जोखीम पत्करून लोकशाही जिवंत ठेवण्याची जबाबदारी पक्षविरहित सर्वच लोकप्रतिनिधींनी उचलायला हवी. वर उल्लेख केल्यानुसार लोकलेखा समितीसारखीच विधिमंडळाची पंचायतराज समिती असते. स्थानिक स्वराज्य संस्था त्यांच्या अखत्यारीत येणाऱ्या विकासाच्या कामांचा निधी कसा वापरतात, त्या विकास कामांचा दर्जा कसा आहे, त्या कामांमधून जनतेचे जीवन सुसह्य झाले की नाही, आदी गोष्टींचा लेखाजोखा ही समिती घेत असते. विधिमंडळाची अंदाज समिती ही अर्थसंकल्पात तरतूद करण्यात येणाऱ्या योजनांवर योग्य पद्धतीने खर्च होतोय की नाही, हे पाहाते. अर्थसंकल्पात जाहीर केलेल्या बाबींची पूर्तता कशा पद्धतीने होते आहे, यावर या समितीतील सदस्य लक्ष ठेवतात. लोकलेखा समिती ही महालेखा परीक्षकांनी सरकारी विकास कामे वा योजनांवर ओढलेल्या ताशेऱ्यांचे अहवाल सरकारकडे पाठवल्यावर संबंधित ठिकाणी जाऊन त्याची पाहणी करून त्याचा अहवाल विधिमंडळात ठेवत असते.अनेक आमदार या व अशा समित्यांवर खूप मन लावून काम करतात. अनेक आमदारांनी अशा समित्यांवर काम करताना पक्षीय अभिनिवेश बाजूला ठेवून केलेल्या कामांचे दाखले विधिमंडळाच्या इतिहासात आहेत. मात्र, अलिकडच्या काळात या समित्यांनी दिलेल्या अहवालांना गांभीर्याने घेण्याचे प्रमाण घटले आहे. अहवाल विधिमंडळाच्या सभागृहात सादर केला जातो. तो सभागृहातील सर्व सदस्यांना कागदपत्राच्या भल्यामोठ्या बाडातून दिला जातो. काही प्रसार माध्यमे त्यातील बातम्या करतात व पुढे काहीच होत नाही. त्यामुळे आपण केलेले दौरे, अभ्यास, मेहनत याचे नक्की फलित काय, असा प्रश्न पडून या समित्यांवर काम करणाऱ्या विधिमंडळ सदस्यांना नैराश्य येत नसल्यासच नवल म्हणायचे. त्यामुळे अनेक सदस्यांचा या समित्यांमधील सहभागही सध्या नावापुरता झालेला आहे. दुसरीकडे सरकार नामक यंत्रणा ही सर्वशक्तिशाली असून त्याच्या विरोधात ब्र देखील उच्चारल्यास त्यातून व्यक्तिगत लक्ष्य केले जाण्याची भीतीही सध्या भरून राहिलेली आहे. परिणामतः मांजरीच्या गळ्यात घंटा बांधायला तर हवी पण मीच का म्हणून ती बांधावी, असा विचार बहुतांश करतात. त्यामुळे स्वतःचा मतदारसंघ व त्यातील छोट्या मोठ्या विकास कामांसाठी सरकार दरबारी खेटे मारणे, आपल्या ताब्यात राहातील असे प्रशासकीय अधिकारी नेमण्यासाठी अथक परिश्रम घेणे, या पलीकडे लोकप्रतिनिधी लोकशाही वगैरे गोष्टींकडे फारसे लक्ष देत नाहीत. त्यापेक्षा अधिवेशनात 'लक्षवेधी' लावून घेण्याकडेच त्यांचे अधिक लक्ष असते. एकंदर पाहता सत्ताधारी असोत वा विरोधक, हे शेवटी त्या संसदीय लोकशाहीचेच भाग आहेत. ही व्यवस्था ज्या संसदीय आयुधांच्या माध्यमातून पाऊणशे वर्ष टिकली तीच मोडीत काढली गेली, तर त्यांच्याही अस्तित्वापुढे प्रश्न उभा राहणार हे नक्की!

# लोकसभेमधला अतिरेकी हल्ला निंदनीय !!



लोकसभेवर दहशतवादी हल्ल्याला बावीस वर्षे पूर्ण झाली होती पुन्हा एकदा नवीन संसदेमध्ये घुसखोरीची घटना घडलेली सगळ्या देशाने पाहिली आहे, लोकसभेचे कामकाज सुरू असताना प्रेक्षक गॅलरी मध्ये जाऊन दोघाजणांनी लोकसभेमध्ये उतरून जो गोंधळ घातला तो निश्चितच निंदाजनक आहे निंदनीय आहे .. काही घोषणा सुद्धा दिल्या हे खरं खरंच देशाला त्यांनी चॅलेंज केलेल आहे यामध्ये सर्वच्या सर्व आरोपी आज पोलिसांकडून सुरक्षा यंत्रणेकडून अटक करण्यात आलेले आहेत यामध्ये त्या ठिकाणी प्रेक्षक गॅलरीमध्ये उतरलेले दोघेजण आणि बाहेर घोषणा देणारे दोघेजण असे चौघे आरोपी जागेवरच पोलीस यंत्रणे कडून अटक करण्यात आलेले आहेत. बाकी आज उर्वरित दोन आरोपी सुद्धा पुन्हा त्यांना अटक करण्यात आलेली आहे यामध्ये महाराष्ट्रातील अमोल शिंदे नावाचा चाकूर तालुक्यातील लातूर जिल्हा जरी बुद्रुक या गावचा अमोल भगवानराव शिंदे व २४ वर्षे हा सुद्धा एक आरोपी आहे बाकी सागर, मनोरंजन, आणि नीलम, हे सागर लखनऊ ,मनोरंजन हा कर्नाटक, आणि नीलम हरियाणा, येथील हे सर्वजण आहे यामध्ये चौकशी मध्ये असं लक्षात येत आहे की हे वेगवेगळे कारण आज या घटनेला देत आहेत सागर हा बेरोजगारीचा नैराश्यातून त्यांने केल आहे तो लष्कर भरतीमध्ये अपयशी ठरला असं काही जण बोलत आहेत, नीलम हरियाणा ही मुलगी उच्चशिक्षित असून ती शेतकरी आंदोलनामध्ये सक्रिय सहभागी होती, त्याचबरोबर मनोरंजन हा अभियंत आहे इंजिनियर आहे .तर सागर हा रिक्षा चालवतो आहे अशा वेगवेगळ्या श्रेणीतली ही मुलं आहेत परंतु ही सर्व तरुण मुलं आहेत आणि वेगवेगळ्या राज्यातील आहेत असे दिसतं. पण या मागची कटकारस्थान सुरक्षा यंत्रणा आणि दहशतवाद विरोधी पथकाने तपासली पाहिजे त्याचबरोबर नॅशनल इन्वेस्टीगेशन एजन्सी यांनी सुद्धा याची उच्चस्तरीय चौकशी करून याच्या मागची स्लीपर सेल कोण कोण आहेत याची अधिकाधिक चौकशी करून अशा आरोपींना कठोरात कठोर दंड कसा देता येईल याची योजना आखली पाहिजे. संसद लोकसभा ही लोकशाहीचे एक पवित्र मंदिर आहे या पवित्र मंदिरावर जर काही आरोपी हल्ला करीत असतील तर हे निश्चितच देशाच्या साठी धोकादायक गोष्ट आहे, यामध्ये या आरोपीकडून काही चक्रावून टाकणारी माहिती समोर येत आहे १९२९ मध्ये ब्रिटिश राजवटीमध्ये झालेल्या घटनेची त्यांना पुनरावृत्ती करायची होती असे ते आज पोलिसांना सांगता येत असं कळतंय की महान क्रांतिकारक भगतसिंग यांनी सेंट्रल असेंबली मध्ये बॉम्ब फेकला होता असाच प्लॅन आरोपींचा देखील होता अशा प्रकारची माहिती त्यांच्याकडून सुरक्षा यंत्रणेला मिळते आहे त्यासाठी यांनी भगतसिंग नावाचा ग्रुप देखील देशांमध्ये तयार केलेला आहे त्याचबरोबर या ग्रुपच्या माध्यमातून देशातील हे सर्व आरोपी एकमेकांच्या संपर्कात राहत होते अशी माहिती पोलिसांकडून एका पत्रकाद्वारे आरोपीच्या पत्रातून कळते आहे, दोघाजणांच्या हातात काही पत्रक होते ज्यामध्ये त्यांनी लिहिले की पंतप्रधान बेपत्ता आहेत आणि जो कोणी त्यांना शोधून काढेल त्याला स्विस बँकेतून पैसे मिळतील, असा मजकूर लिहिण्यात आलेला होता असं पोलीस सांगत आहे ,संसदेत घुसखोरी करणाऱ्या आरोपींच्या चपला ज्यामध्ये त्यांनी स्मोक कॅन्डल त्याच्या चप्पल मध्ये घेऊन ते आत मध्ये गेले अशा प्रकारची चपलाची रचना या आरोपींनी केलेली होती त्या चपला त्यांच्यासाठी खास डिझाईन करण्यात आलेल्या होत्या त्यात धूर कॅन लपवण्यासाठी जागा तयार करण्यात आलेली होती त्याचबरोबर आरोपींनी संसदेमध्ये पेम्प्लेट फेकण्याची योजना सुद्धा आखली होती असेही त्यांच्याकडून आज कळत आहे त्यामध्ये त्या पेम्प्लेट वर सुद्धा काही असे वाक्य लिहिण्यात आलेले आहेत की ज्याने देशामध्ये अस्थीरता निर्माण करण्यास कारणीभूत होऊ शकतात, म्हणून या आरोपींनी जो काही लोकसभेमध्ये प्रेक्षक गॅलरीमध्ये उतरून स्मोक कॅन्डल पेटवून तो गोंधळ घातलेला आहे सभापती कडे पळत जाऊन जो गोंधळ घालण्याचा आणि जगाला दाखवण्याचा जो प्रयत्न केलेला आहे हा निश्चितच धोकादायक आहे आणि म्हणून या सर्व प्रकाराची उच्चस्तरीय चौकशी झालीच पाहिजे आणि याच्या पाठीमागे जे काही कारण आहे कोणी म्हणेल बेरोजगारी कोणी म्हणेल आणखी काही, नैराश्य , या गोष्टी या ठिकाणी ग्राह्य धरल्या धरता येणार नाही बेरोजगारी ही समस्या देशांमध्ये मोठ्या प्रमाणात जरी असली किंवा उच्च शिक्षण घेऊन नोकऱ्यांचे प्रमाण जरी कमी होत असलं तरी याचा अर्थ असा थोडाच होतो की त्या उच्चशिक्षित लोकांनी बेरोजगार लोकांनी किंवा ज्यांना नोकऱ्या नाहीत अशा लोकांनी संसदेवर मंदिरावर किंवा सुरक्षा यंत्रणेंच्या आणखी काही भागावर हल्ला करण्यास त्यांना परवानगी द्यावी, असा थोडा त्याचा अर्थ होतो म्हणून वेगवेगळ्या राज्यातील मुलं एकत्र येतात कशी आणि मग फक्त ती लोकसभेमध्ये प्रेक्षक गॅलरीमध्ये उतरून गोंधळ घालतात कशी ,दोघाजणांनी आत मध्ये येऊन गोंधळ घालायचा दोघा जणांनी लोकसभेच्या बाहेर घोषणा द्यायच्या आणि बाकी त्यांना तिथपर्यंत येण्यासाठी जे जे काही यंत्रणा यामध्ये सहभागी आहेत यांच्यावरती कठोरात कठोर कारवाई व्हायला पाहिजे जेणेकरून देशाची सुरक्षा यंत्रणा आणि देशांची आज जगामध्ये ताकद वाढत आहे .भारताला एक नावलौकिक मा.नरेंद्र मोदींच्या माध्यमातून आज जगामध्ये मिळत आहे याला या नावाला कुठेतरी कमी करण्याचा प्रयत्न या पाठीमागे आहे का? याचीही चौकशी झाली पाहिजे त्याचबरोबर या आंदोलनामध्ये काही जी मुलं आहेत ही शेतकरी आंदोलनामध्ये सक्रिय होती यामागे दुसरे कोणी नेते आहेत का किंवा परदेशी गुप्तचर यंत्रणांचा यामध्ये काही इनडायरेक्ट संबंध आहे का याचीही चौकशी झाली पाहिजे, यांचे चेहरे या आरोपींची चेहरे जरी साधे दिसत असले किंवा बेरोजगारी उच्च शिक्षणातला नैराश्य आलेलं या गोष्टी जरी समोरून दिसत असल्या तरी यामध्ये त्यांचा ब्रेनवाश करण्याचं काम कुठल्या यंत्रणा करीत आहेत याचा शोध आज घेतला पाहिजे निश्चितच यामध्ये परदेशीय यंत्रणांचा सहभाग असू शकतो त्याबरोबर देशांमध्ये एक मोठ कटकारस्थान देशाच्या विरोधामध्ये कुठेतरी रचल्या जाते आहे का ? अशा प्रकारच काम या माध्यमातून आज दिसत आहे निश्चितच ही गंभीर गोष्ट आहे आणि माफ करण्यासारखी गोष्ट नाही म्हणून या आरोपींना कठोरात कठोर दहशतवाद विरोधी सर्व गुन्हे देश विरोधी सर्व गुन्हे यांच्यावर टाकून भविष्यामध्ये पुन्हा अशा गोष्टी घडू नयेत, नसता येणाऱ्या काळामध्ये देशाच्या देशाच्या सर्व च यंत्रणेवर लोकसभेवर जर हल्ला होत असेल आणि यांना जर माफ केलं तर पुन्हा दुसरे हल्ले आणखीन देशाच्या सुरक्षा यंत्रणावर म्हणा किंवा अन्य महत्त्वाच्या ठिकाणी यासारखे लोक हल्ल्यास प्रवर्त होतील आणि निश्चितच ही देशासाठी मान खाली घालवणारी गोष्ट असेल, यामध्ये कोणी कुठलाही असो तो आरोपी आहे तो देशाचा विरोधक आहे या नियमाने यांच्यावरती मोठमोठे गुन्हे दाखल करून यांना कठोरात कठोर शिक्षा झाली पाहिजे. जेणेकरून पुन्हा असा प्रकार या देशांमध्ये होणार नाही जो संसदेवर बावीस वर्षांपूर्वी हल्ला झाला होता यामध्ये काही जवान शहीद झाले होते आणि म्हणून तशाच प्रकारचा हा पूर्वनियोजित हल्ला आहे हल्ल्याची ही दुसरी प्रवर्ति आहे त्यामध्ये फक्त शस्त्र नाहीये घोषणा आणि मध्ये येऊन गोंधळ करण्याचा जो काही प्रयत्न आहे हो निश्चितच हा भारताचा साठी बाहेर आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचे नाव कमी करण्याचा हा एक प्रयत्न आहे, निश्चितच दिसणारे समोर दिसणारे चार आरोपी हे गुन्हेगार आहेतच, यात आणखीही आरोपी आहेत किंवा त्यांचे पाठिंबा पाठीराखे परंतु यामागे निश्चितच मोठी यंत्रणा आहे, याचा विचार सुरक्षा यंत्रणाना करावा लागणार आहे ,आणि म्हणून अशा आरोपींना लवकरात लवकर अत्यंत कडक सजा ही दिली पाहिजे असं सामान्य नागरिकांचे आज म्हणणं आहे आणि अशा आरोपींना जर सजा झाली तरच लोकसभेसारख्या संसदेसारख्या मंदिराचे पावित्र्य आबाधित राहील !!



डॉ.गोविंद मस्के
वडवणी

# अरविंदो रियालीटी कंपनीकडून शेतकऱ्यांना एकरी २५ - ३० लक्ष मोबदला व स्थायी नोकऱ्या तसेच त्वरित पुनर्वसन देखील करा

## आमदार प्रतिभा धानोरकर यांनी मांडली लक्षवेधी

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

नागपूर येथील विधिमंडळ अधिवेशनात आमदार प्रतिभा धानोरकर यांनी अरविंदो रियालीटी कंपनीकडून शेतकऱ्यांना एकरी २५ - ३० लक्ष निधी मोबदला मिळावा, स्थायी नोकऱ्या तसेच त्वरित पुनर्वसन देखील करा, या मागणीकरिता लक्षवेधी मांडून सरकारचे लक्ष वेधले. यावेळी कृषी मंत्री अब्दुल सत्तार यांनी शेतकऱ्यांना वाढीव मोबदला देऊन शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय घेणार असल्याचे त्यांनी सांगितले. आमदार प्रतिभा धानोरकर यांनी सांगितले की, अरविंदो रियालीटी कंपनीला केंद्र सरकार व्दारे एकुण ९३६ हेक्टर आर जमिन ही कोळसा खाणीकरिता अलॉट करण्यात आलेली आहे. त्यापैकी १२८ हेक्टर आर शेतजमिन अरविंदो रियालीटी कंपनीला केंद्र सरकारच्या स्पेशल प्रोव्हिजन ॲक्ट २०१५ अन्वये हस्तांतरीत करण्यात आलेली आहे. व उर्वरीत ८०८ हेक्टर आर जमिन संपादीत करावयाची आहे.याबाबत आमदार प्रतिभा धानोरकर म्हणाल्या की, उर्वरीत ८०८ हेक्टर जमिन संपादीत करत असतांना शेतकरी व गावक-यांमध्ये समन्वय साधुन त्यांना त्यांच्या मागणीनुसार शेतजमिनीचा २५ - ३० लक्ष रुपये एकरी मोबदला व कंपनीमध्ये स्थायी नोकरी मिळालीच पाहिजे हि आमची आग्रही मागणी आहे,आमदार प्रतिभा धानोरकर यांनी अरविंदो कंपनीकडून सेंट्रल कॉलरी कंपनी नागपूर (डागा) या आस्थापनेवर जुने प्रकल्पग्रस्त १६ कामगार कार्यरत होते, आमच्या मागणी नुसार त्यांना स्थायी नोकरीत सामावुन घेतले व



सानुग्रह मदत म्हणुन प्रत्येकी ७ लाख रूपये दिल्याबद्दल कंपनीचे कौतुक केले.आमदार प्रतिभाताई धानोरकर यांनी सांगितले की, सदर प्रकल्पात बेलोरा या गावची संपुर्ण शेतजमिन संपादीत होत असल्याने बेलोरा गावाचे पुनर्वसन तात्काळ करण्यात यावे व त्यासंदर्भाने पुनर्वसन करार करण्यात यावा.आमदार प्रतिभा धानोरकर यांच्या या मागण्यांवर सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद मिळून शेतकऱ्यांना लाभ होईल अशी अपेक्षा आहे.

# चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे टेस्ट ऑडिट होणार

## आमदार प्रतिभा धानोरकर यांच्या प्रश्नावर सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांचे आश्वासन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जिल्हा मध्यवर्ती बँक चंद्रपूरच्या संदर्भात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी गतिमान पद्धतीनं पूर्ण केली जाईल आणि आवश्यकता असल्यास या बँकेचे टेस्ट ऑडिट सुद्धा केलं जाईल. त्याचा निर्णय साधारणतः एक महिन्याच्या आत मध्ये येईल आणि तो निर्णय आल्यानंतर पुढील कारवाई करू, असे आश्वासन राज्याचे सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी दिले.


नागपूर हिवाळी अधिवेशनाच्या विधिमंडळ सभागृहात आमदार प्रतिभा धानोकर यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधीवर उत्तर देताना सहकार मंत्री बोलत होते.आमदार प्रतिभाधानोरकर म्हणाल्या, जिल्हा बँक ही खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांना कर्ज देणारी आणि शेतकऱ्यांना अडी अडचणीच्या काळात सांभाळून घेणारी बँक आहे. मात्र, याला चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती बँक अपवाद आहे. सदर बँकेला १११ वर्षाचा इतिहास आहे .आजपर्यंत बँकेच्या नियमित निवडणुका होत होत्या. परंतु २०१२ नंतर २०१७ रोजी शासनाने निवडणूक घेणे अपेक्षित असताना, देखील आज २०२३ पर्यंत निवडणुका झाल्या नाहीत. याचा फायदा घेऊन २०१७ व २०२३ या सहा वर्षाच्या काळातील बँकेतील काही संचालकांनी जो गैरवव्यवहाराचा कळस गाठला आहे. २०२३ ला झालेल्या नोकर भरतीत भ्रष्टाचार झाल्याचे सिद्ध झाले. बँकेच्या सहा संचालकावर आणि पाच कर्मचाऱ्यावर गुन्हे देखील दाखल केलेले आहे, आणि सदर बँकेची प्रतिमा या प्रकरणामुळे मलिन झाली. २०२० मध्ये देखील बँकेच्या काही कर्मचाऱ्यांनी आरोग्याचे कारण दाखवून पाल्यांना अनुकंपतत्वावर नोकरी दिली. तसेच खरेदी घोळ झाल्याने दोन संचालकांना म्हणजे एकूण सात संचालकावर गुन्हे दाखल झाले. या बँकेत गैरव्यवहार



झाल्याचे महाराष्ट्र सरकारच्या सहकार विभागाला देखील माहित आहे. ३.९७ कोटीची वसुली करता संचालकांना सहकार कायद्यांनुसर नोटीस देखील बजावल्या गेल्या. बँकेतील सीईओ कल्याणकर यांच्यावर दोन गुन्हे दाखल असताना संचालक मंडळाने परस्पर ठराव घेऊन अजूनही बँकेचा पदभार त्यांच्याकडे आहे. रिझर्व बँक व नाबार्ड यांच्या नियमानुसार गुन्हे दाखल असणाऱ्यांना नेमणूक दाखल करता येत नाही. परंतु रिझर्व बँक व नाबार्ड यांनी दिलेल्या फॉर्मेटमध्ये सीओवर असणाऱ्या दोन गुन्ह्याची माहिती ही सदर बँकेच्या संचालक मंडळांनी लपवली आणि रिझर्व बँक व नाबार्डची यांनी देखील फसवणूक केली. या संदर्भात देखील रामनगर पोलीस स्टेशन अंतर्गत गुन्हा दाखल आहे. परंतु त्यावर कुठलीही कारवाई त्या ठिकाणी झाली नाही.आमदार प्रतिभा धानोरकर यांनी आपल्या लक्षवेधी नोटमध्ये या बँकेत गेल्या सहा वर्षांत झालेल्या गैरव्यवहारांचा उल्लेख केला आहे. त्यात नोकर भरतीचा भ्रष्टाचार, कर्मचाऱ्यांना अनुकंपा तत्त्वावर नोकरी देणे, सीईओवर गुन्हे दाखल असतानाही त्यांची नेमणूक, बँकेचा एनपीए वाढणे, बँकेच्या किरायाच्या जागेवर शिष्यवृत्ती देण्यासाठी पैसे खर्च करणे, संगणक खरेदीसाठी जास्त पैसे खर्च करणे, शेतकरी भवनसाठी जास्त वेळ घेणे, शेतकऱ्यांच्या सहकार संस्थांना मतदानाचा अधिकार नाकारणे, शेतकरी कल्याण निधीचा वापर सर्रास करणे, यासारख्या बाबींचा समावेश आहे.सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील म्हणाले, या बँकेच्या संदर्भात हायकोर्टाने दिलेला स्टे उठवण्यासाठी आम्ही प्रयत्न करू. त्यानंतर निवडणुका घेऊन नवीन संचालक मंडळ नेमले जाईल. त्यावेळी या सर्व बाबींची चौकशी करून कारवाई केली जाईल.असे मंत्री म्हणाले.आमदार प्रतिभा धानोरकर यांनी वळसे पाटील यांना या प्रकरणी सखोल चौकशी करण्याची विनंती केली आहे.

# खेळाडूंची आंतरराष्ट्रीय स्तरावर कामगिरी उंचावण्यासाठी 'मिशन लक्ष्यवेध' राबवणार

## क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे



**परभणी(प्रतिनिधी)**–राज्यातील खेळाडूंची कामगिरी सातत्याने उंचावण्यासाठी योजनांबद्ध कृती कार्यक्रम क्रीडा विभागाने हाती घेतला आहे. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा व खेलो इंडिया, आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेत खेळाडूंना केंद्रबिंदू मानून खेळाडू व स्पर्धा केंद्रीत 'मिशन लक्ष्यवेध' आराखडा तयार करण्यात आला आहे. मंत्रिमंडळाने क्रीडा विभागाच्या प्रस्तावाला मान्यता दिली असून मिशन लक्ष्यवेध ही महत्त्वकांक्षी योजना राबविण्यात येणार आहे, असे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी सांगितलेक्रीडा क्षेत्रात अतिउत्कृष्ट कामगिरी करणा-या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थेशी करार करण्यात येणार असून, या योजनेच्या सनियंत्रणासाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे रुपांतर महाराष्ट्र क्रीडा प्राधिकरण करण्यात येणार आहे, असे क्रीडा मंत्री संजय बनसोडे म्हणाले.प्रथम टप्यात १२ खेळ निश्चित केले असून यामध्ये अँथलेटिक्स, बॅडमिंटन, बॉक्सिंग, वेटलिफ्टिंग, हॉकी, कुस्ती, आर्चरी, शूटींग, रोइंग, सेलिंग, लॉन टेनिस व टेबल टेनिस या खेळांचा समावेश आहे. या खेळांची हाय परफॉर्मन्स सेंटर राज्यात विविध ठिकाणी सुरु करण्यात येणार आहे. तसेच विभागीस्तरावर ३७ स्पोर्टस एक्सलन्स सेंटर व जिल्हास्तरावर १३८ क्रीडा प्रतिभा विकास केंद्रांची स्थापना करण्यात येणार आहेत. जिल्हा विकास आराखडा तयार करुन १० टक्के निधी क्रीडा विकास आराखड्यासाठी राखीव ठेवण्यात येणार आहे. पुणे येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलात अत्याधुनिक सुसज्ज असे स्पोर्ट्स सायन्स सेंटर स्थापन करण्यात येणार आहे. तसेच विभागीय व जिल्हास्तरावर खेळाडूंसाठी समुपदेशन केंद्राची स्थापना करण्यात येणार आहे. त्याद्वारे खेळाडूंना करिअरच्या संधीची माहिती दिली जाणार आहे.निवडलेल्या १२ खेळ प्रकाराच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. १६० कोटी इतका निधी उपलब्ध करुन दिला जाणार आहे. तसेच प्रशिक्षण केंद्र व इतर सुविधांकरिता जिल्हा स्तरावर अंदाजे ५५ कोटी, विभागीय स्तरावर ५५ कोटी आणि राज्य स्तरावर ५० कोटी खर्च अपेक्षित आहे.जिल्हास्तरावर १३८ क्रीडा प्रतिभा विकास केंद्रांची स्थापना करण्यात येईल. त्याचबरोबर विभागीय मुख्यालयाचे ठिकाणी उपरोक्त निकषानुसार एकूण ३७ स्पोर्ट्स एक्सलन्स सेंटरची स्थापना करण्यात येईल. त्याचप्रमाणे राज्यस्तरावर १२ हाय परफॉर्मन्स सेंटरची स्थापना करण्यात येईल. या माध्यमातून जिल्हास्तरावर २७६०, विभागीय स्तरावर ७४० आणि राज्यस्तरावर २४० अशा एकूण ३७४० खेळाडूंच्या अद्ययावत क्रीडा प्रशिक्षणाची व्यवस्था केली जाणार आहे.

# सभागृहात एक अन् बाहेर एक भूमिका मांडण्याचा धंदा बंद करा:अजित पवार

**नागपूर**–हिवाळी अधिवेशनाचा आजचा शेवटचा दिवस वादळी ठरला आहे. विरोधकांनी राज्य सरकारवर जोरदारी हल्लाबोल केल्यानंतर सत्ताधाऱ्यांनी विरोधकांना तसेच उत्तर दिल्याचे पाहायला मिळाले. दोन उपमुख्यमंत्र्यांपैकी कुणी आधी बोलायचे ते ठरवा असा टोला जयंत पाटलांनी लगावल्यानंतर अजित पवार चांगलेच भडकले.दरम्यान अजित पवार यावर बोलताना म्हणााले की, आमच्याच अंडरस्टँडिंग असून कोण बोलायचे ते आम्हाला माहिती आहे असे म्हणतानाच विरोधकांच्या मुद्द्यावरून सभागृहात एक आणि बाहेर एक भूमिका मांडण्याचा धंदा बंद करा असा सल्लाही त्यांनी जयंत पाटील यांना दिला आहे.शेवटच्या दिवशी केवळ तीन प्रस्ताव मांडल्यानंतर जयंत पाटलांनी राज्य सरकारवर टीका केली आहे. ते म्हणाले की, सभागृह संपले नाही. एक तर दहा दिवसांचे अधिवेशन केले आणि तिकडून दोन प्रस्ताव आणि इकडून एक प्रस्ताव असे हे बरोबर नाही. त्यासाठी आम्ही म्हणत होतो की एक महिन्याचे अधिवेशन घ्या आणि चर्चा करा.जयंत पाटलांच्य भाषणावेळी दोन्ही उपमुख्यमंत्री एकमेकांशी चर्चा करत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर जयंत पाटील म्हणाले की, तुमच्यात आधी ठरवा की कोण आधी बोलायचे ते.उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आपल्या निदर्शनास आणून देतो, आमचा प्रस्ताव हा आमचा शेतकऱ्यांबद्दल होता, तुम्ही तसा दिला नाही. म्हातारी मेल्याचे दुः ख आहे पण काळ सोकावतोय. विरोधी पक्षाला विदर्भातच येऊन विदर्भाचा विसर पडला हे बरोबर नाही, असा टोलाही त्यांनी यावेळी बोलताना लगावला आहे.अजित पवार म्हणाले की, आमचे अंडरस्टँडिंग चांगले आहे. त्यामुळे कसे बोलायचे आम्हाला माहिती आहे. कामकाज सल्लागार समितीमध्ये वेळ कमी उरला. अंतिम आठवडा प्रस्ताव काल आला होता, त्यावेळी विरोधी पक्षाला माहिती होते की अधिवेशन आज संपणार आहे. त्यावेळी त्यांनी सांगायला पाहिजे होते. सभागृहात एक बोलायचे आणि बाहेर एक बोलायचे हे धंदे बंद करा,विदर्भाच्याबद्दल उत्तर आलेच पाहिजे यासाठी आम्ही ठरवले.त्यासाठी प्रवीण दरेकरांनी विदर्भाचा प्रस्ताव मांडला. अतिशय चांगल्या पद्धतीने ते काम त्यांनी केले असे अजित पवारांनी म्हटले.

# न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज सांगोला मध्ये संत गाडगेबाबा महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन

## सिंहाला पहावे वनात....हत्तीला पहावे रानात.....अन गाडगेबाबांना पहावे कीर्तनात–तानाजी सूर्यगंध सर

**सांगोला**–२० डिसेंबर हा दिवस राष्ट्रसंत गाडगेमहाराज यांचा स्मृतिदिन, या दिवशी सर्वत्र त्यांना विनम्र अभिवादन केले जाते, याचे औचित्य साधून न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज सांगोला मध्ये राष्ट्रसंत गाडगेबाबा महाराज यांच्या प्रतिमेस कॉलेजचे उपप्राचार्य केशव माने सर यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.याप्रसंगी संस्था सदस्य प्रा. डॉ. अशोक शिंदे, प्रा. दीपक खटकाळे , प्रा.जयंत जानकर, पर्यवेक्षक प्रा.संजय शिंगाडे, कार्यक्रम आयोजन समितीचे प्रमुख प्रा.चंद्रकांत इंगळे, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा मिलिंद पवार, जुनिअर कॉलेजमधील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून थोर विचारवंत मा. तानाजी सूर्यगंध सर लाभले होते, तर अध्यक्षस्थानी न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज सांगोला चे उपप्राचार्य प्रा केशव माने होते.आपल्या मार्गदर्शनपर मनोगतामध्ये मा. तानाजी सूर्यगंध सर असे म्हणाले की, गाडगेबाबा महाराज यांनी गोर-गरीब, दिन-दलित, अंध- अपंग, निराश्रीत लोकांच्यासाठी अन्न व निवाऱ्याची सोय व्हावी या उद्देशाने त्यांनी अनेक धर्मशाळा बांधल्या व शिक्षणासाठी विद्यालय सुरू केली. या निराश्रीत लोकांच्यासाठी मोफत दवाखान्याची सोय केली. त्याचबरोबर त्यांनी




कुष्ठरोग्याची सेवा केली.आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून त्यांनी देव मंदिरात नाही, मूर्तीत नाही, आहे आपल्या हृदयात.. त्यांनी मूर्ती पूजेला कडाडून विरोध केला. त्याविषयी ते कीर्तनात म्हणतात की,

दगडाचिया देवा घेता डोई।
कपाळ फुटेल, परंतु मोक्ष नाही।।
दगडाच्या देवा जोडोनिया हात। करून घेऊ घात सकाळजणा ।।

कीर्तन करत असताना त्यांची भाषा ग्रामीण भागातील सामान्य माणसाला समजेल अशा पद्धतीची होती. त्यांची वाणी ओघवती व रसाळ अशा पद्धतीची होती. त्यांच्या कीर्तनातील जोश पाहून प्रसिद्ध साहित्यकार प्र के अत्रे म्हणतात की,

सिंहाला पहावे वनात....
हत्तीला पहावे रानात.....
अन गाडगेबाबांना पहावे कीर्तनात..

कीर्तन करत असताना ते देवधर्मावरती बोलत नसत. मुलांना शिक्षण द्या, कर्जबाजारी होऊ नका, अंधश्रद्धेला बळी पडून मुक्या प्राण्यांना बळी देऊ नका. त्यांनी स्वतः परिसर स्वच्छ करून स्वच्छतेचा सामाजिक संदेश दिला.६ डिसेंबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण झाले. हे ज्यावेळेस संत गाडगे महाराजांना समजले त्यावेळी त्यांनी देशाचा वाली हरपला..! असे उद्गार काढले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण त्यांच्या मनाला फारच लागले व त्यांनी अन्न त्याग केला. १४ दिवस अन्नाचा कणही त्यांनी घेतला नाही. २० डिसेंबर १९५६ रोजी संत गाडगे महाराजांनी आपला देह ठेवला व अनंतात विलीन झाले. कोणतेही रक्ताचे नाते नसताना, सामाजिक बांधिलकी, सामाजिक परिवर्तन व समाज सुधारण्याची नाळ यातून दिसून येते, असे उपस्थितांना मा. तानाजी सूर्यगंध सर यांनी सांगितले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रासौ जुलेखा मुलानी मॅडम यांनी केले, तर आभार प्रा मिलिंद पवार यांनी मानले.

# प्रतापगड पायथ्याचे स्वराज्यद्रोही अतिक्रमण हटविल्या बद्दल सुधीर मुनगंटीवार यांना पुण्यात सुवर्णकंकण अर्पण

## सर्व संकटांतून मुक्त होण्याचा मार्ग म्हणजे शिवचरित्र : सुधीर मुनगंटीवार

**पुणे । प्रतिनिधी**

प्रतापगडाच्या पायथ्याशी स्वराज्यद्रोही अफजलखानाचे उदात्तीकरण करणारे अतिक्रमण खंबीरपणे हटविल्याबद्दल काल मंगळवारी पुण्यातील नातूबाग मैदानात सांस्कृतिक कार्य आणि वन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांचा सुवर्णकंकण अर्पण करून सत्कार करण्यात आला. 'हिंदवी स्वराज्य भूषण वीर जिवा महाले पुरस्काराने' यावेळी सुधीर मुनगंटीवार यांना निवृत्त एअर मार्शल जयंत इनामदार यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. सर्व संकटातून मुक्त होण्याचा मार्ग शिवाजी महाराजांच्या जीवनकार्यात आहे, हाच विचार घेऊन सर्वांनी पुढे जावे, असे आवाहन यावेळी सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

प्रतापगड उत्सव समितीतर्फे झालेल्या या हृद्य सत्कार समारंभास पुणेकर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलतांना सुधीर मुनगंटीवार यांनी शिवभक्तांच्या प्रेमाचे ऋण हीच आपल्या कार्याची प्रेरणा असल्याचे प्रतिपादन केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेत आणि अफजलखान वधात महत्त्वाची भूमिका असलेली महाराजांची वाघनखे लवकरच भारतात येतील आणि लंडनमध्ये महाराजांचा भव्यदिव्य पुतळा उभारण्यात येईल, याचाही पुनरुच्चार सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी यावेळी केला. प्रतापगड उत्सव समितीने केलेल्या या सत्काराला उत्तर देतांना मंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले, की छत्रपती शिवाजी महाराजांशी संबंधित सर्व ठिकाणी त्यांच्या स्मृती राज्य सरकारच्यावतीने जपल्या जातील. छत्रपती शिवाजी महाराज खरे लोकशाहीचे जनक आहेत. त्यामुळे संसद परिसरात शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचा प्रसंग उभारण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना विनंती करण्यात येईल. १२ जानेवारी रोजी राजमाता जिजाऊ यांच्यावरील टपाल तिकीटाचे अनावरण करण्यात येणार आहे. सिंदखेडराजा परिसर विकास कामांसाठी २५० कोटी रुपयांचा विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. सांस्कृतिक विभागातर्फे छत्रपतींच्या जीवनावर आधारित आतापर्यंत २ टपाल तिकीटे काढण्यात आली असून आणखी १० तिकीटे काढण्यात येणार आहे. राजमाता जिजाऊ, छत्रपती संभाजी महाराज यांचे तिकीट काढण्यात येणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या राज्यभिषेक महोत्सवानिमित्त हिंदवी स्वराज्याचे चलन असलेले होन रीझर्व बँकेच्या माध्यमातून पुन: प्रकाशित करणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. ज्या दरबारात शिवाजी महाराजांचा अपमान केला त्या आग्र्याच्या दरबारात गतवर्षी शिवजयंती साजरी करण्यात आली,



तो अभिमानाचा क्षण होता असेही ते म्हणाले. नवा उत्साह आणि नवी ऊर्जा घेण्यासाठी कार्यक्रमाला आल्याचे नमूद करून मंत्री मुनगंटीवार म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने स्फूर्ती मिळते. मोगल आक्रमण होत असताना त्यांच्या दैवी अवताराचे दर्शन घडले. भय, गर्व आणि वासनारहित समाज उभा राहावा, तो परकीय आक्रमणापुढे दबून जाऊ नये म्हणून त्यांनी हिंदवी स्वराज्य स्थापन केले. त्यांच्या पराक्रमामुळे त्यांच्या नंतरही औरंगजेबाला महाराष्ट्र जिंकता आला नाही. काश्मिरमधील कुपवाडा येथील भारत-पाक नियंत्रण रेषेजवळ उभारण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा त्यांच्या याच अलौकिक कार्याची प्रेरणा देशाचे रक्षण करणाऱ्या सैनिकांना देत त्यांच्यासाठी ऊर्जादायी ठरेल, असे ते म्हणाले. यादेशात केवळ विजेता किंवा धनवान हा आदर्श असत नाही तर या देशासाठी छत्रपती शिवाजी महाराज, महाराणा प्रताप, झाशीची राणी लक्ष्मीबाई हेच आदर्श आहेत. हा देश सदाचारावर आणि आध्यात्मिक विचारावर चालतो, असेही ते म्हणाले.छत्रपती शिवाजी महाराजांच्या आरतीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी एअर व्हाईस मार्शल जयंत इनामदार (निवृत्त) यांच्या हस्ते मंत्री ना.मुनगंटीवार यांना सन्मानित करण्यात आले. त्यांच्या हस्ते विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. यावेळी निवृत्त एअर व्हाईस मार्शल जयंत इनामदार, सुनील देवधर, मिलिंद एकबोटे, नंदकुमार एकबोटे यानी ना.सुधीर मुनगंटीवार यांच्या कार्याबद्दल आणि धडाडीच्या कार्यशैली बद्दल गौरवोद्गार काडशे. शिवप्रतापदिनानिमित्त प्रतापगड उत्सव समितीने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी ना.सुधीर मुनगंटीवार यांच्यासोबत निवृत्त एअर व्हाईस मार्शल जयंत इनामदार, भाजपाचे राष्ट्रीय सचिव सुनिल देवधर, भाजपा पुणे शहर अध्यक्ष धीरज घाटे, स्वाती मोहोळ, मिलिंद एकबोटे, नंदकुमार एकबोटे आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. यावेळी ना.सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते निवृत्त एअर व्हाईस मार्शल जयंत इनामदार, संभाजी बालघरे, आ. महेश लांडगे, ड. निलेश आंधळे, स्वाती मोहोळ,हेमंत जाधव यांचाही सन्मान करण्यात आला.

# जिल्यातील कृषी निविष्ठा धारकांच्या चतुर्थ तुकडीच्या प्रशिक्षणाला सुरवात

**आनंदवन । प्रतिनिधी**

महारोगी सेवा समिती, वरोरा द्वारा संचालित, डॉ. पं.दे.कृ.वि अकोला संलग्नित आनंदवन कृषी तंत्र विद्यालय, वरोरा च्या पुढाकाराने तसेच राष्ट्रीय कृषी विस्तार व्यवस्थापन संस्था हैद्राबाद, वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था नागपूर, कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने कृषी निविष्ठा धारकांच्या ऊ-एडख अभ्यासक्रमाच्या चतुर्थ बॅचच्या उद्घाटनाचा कार्यक्रम आनंदवन कृषी तंत्र विद्यालय येथे दिनांक १९ डिसेंबर २०२३ ला पार पडला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माननीय प्रिती हिरळकर प्रकल्प संचालक, आत्मा, चंद्रपूर सुशांत लव्हटे उपविभागीय कृषी अधिकारी वरोरा, सुधाकर कडू विश्वस्त म.से.स आनंदवन व डॉ. सुहास पोतदार, प्राचार्य, आनंद निकेतन कृषी महाविद्यालय, वरोरा, . हर्षदा पोतदार प्राचार्य



आनंदवन कृषी तंत्र विद्यालय, आनंदवन तसेच प्रशिक्षण सुलभकर्ता एस.बी. बुऱ्हाण उपस्थित होते.प्रसंगी माननीय प्रिती हिरळकर प्रकल्प संचालक, आत्मा, चंद्रपूर, यांनी, कृषी निविष्ठा धारकांचा शेतकऱ्यांसोबत सतत संपर्क होत असतो त्यामुळे शेतकऱ्यांना रसायनाचा वापर कमी करून जमिनीचे आरोग्य कसे सुधारता येईल या विषयी मार्गदर्शन तसेच कृषी विभागाच्या योजना थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहचवून त्यांच्या गरजा आणि समस्यांशी जोडण्याचे आवाहन केले. सुशांत लव्हटे उपविभागीय कृषी अधिकारी वरोरा, यांनी शेतकरी घेत असलेल्या पिकांचा पुरेपूर अभ्यास करून किडी व रोग व्यवस्थापन यांचे नियंत्रण एकात्मिक पद्धतीने कसे करता येईल याबाबत कृषी निविष्ठा धारकांनी शेतकऱ्यांना सुचवावे याबद्दल मार्गदर्शन केले.सुधाकर कडू यांनी रासायनिक पद्धतीने केलेल्या शेतीमुळे जमिनीचे बिघडलेले आरोग्य यावर उपाय म्हणून सेंद्रिय शेती यांवर मार्गदर्शन करून मातीचे महत्व कृषी निविष्ठा धारकांना पटवून दिले.डॉ.एस.एस.पोतदार यांनी कृषी निविष्ठा धारकांनी ऊ-एडख अभ्यासक्रमामधून जास्तीत जास्त ज्ञान आत्मसात करून शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षक म्हणून काम करावे तसेच अभ्यासक्रमाबद्दल माहिती देऊन काळानुसार शेतीमध्ये होणारे बदल व पर्यावरणाच्या आरोग्याचा विचार करून नैसर्गिक शेती ही काळाची गरज आहे यावरही त्यांनी लक्ष वेधले.कार्यक्रमाच्या समन्वयक हर्षदा पोतदार यांनी प्रास्ताविका मधे सहभागी कृषी निविष्ठा धारकांना पदविका रेकॉर्ड, शिवार फेरी आणि संपूर्ण ऊ-एडख अभ्यासक्रमाविषयी सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाला DAESI तृतीय व चतुर्थ बॅचच्या सुलभकर्ता सीमा बुऱ्हाण , कृषी निविष्ठा धारक तसेच विद्यालयातील शिक्षक व शिक्षेकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अतुल देवगडे यांनी केले व स्मिता किनाके यांनी आभार मानले.

# प्रा.वलेकर यांना राज्यस्तरीय अग्रणी उत्कृष्ट ग्रामीण वाङ्मय पुरस्कार प्रदान

**उदनवाडी–**माणदेश महाविद्यालय, जुनोनी येथील मराठी विषयाचे प्रा. कवी मुकुंद वलेकर यांना 'शिवारमाती डॉट कॉम 'या कवितासंग्रहासाठी अग्रणी प्रतिष्ठान,देशिंग ( ता. कवठेमहांकाळ )यांचा 'राज्यस्तरीय अग्रणी उत्कृष्ट ग्रामीण वाङ्मय पुरस्कार 'दिनांक १७ डिसेंबर,२०२३ रोजी प्रदान करण्यात आला.सदरचा पुरस्कार हा दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा,कोल्हापूरचे अध्यक्ष व ज्येष्ठ कवी प्रा.भीमराव धुळूबुळू यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी २१ व्या अग्रणी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष व शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख प्रा.डॉ. नंदकुमार मोरे, अग्रणी साहित्य संमेलनाचे संस्थापक कवी दयासागर बन्ने,अध्यक्ष भरत खराडे,प्रा.डॉ.सागर पाटील,ज्येष्ठ साहित्यिक प्रा. गौतमीपुत्र कांबळे,देशिंगचे सरपंच प्रवीण पवार,हरोली गावच्या सरपंच रेश्मा पाटील ,दिनकर पाटील, मुक्त सृजन साहित्य पत्रिका, छत्रपती संभाजीनगर चे संपादक प्रा.डॉ.महेश खरात, ज्येष्ठ कवी धनंजय सोलंकर आदी मान्यवर उपस्थित होते. सन्मानचिन्ह,रोख रक्कम, मानाचा फेटा,शाल व पुष्पगुच्छ असे पुरस्काराचे स्वरूप होते. ग्रामीण जीवनातील शेतकऱ्यांची सुख -दुःखे अत्यंत रोखठोकपणे प्रा. मुकुंद वलेकर यांनी' शिवारमाती डॉट कॉम' या कृषिकेंद्रित कवितासंग्रहातून प्रभावीपणे मांडली आहेत. 'शिवारमाती डॉट कॉम 'या कवितासंग्रहाला आतापर्यंत महाराष्ट्रातून सहा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरवण्यात आले आहे. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल उदनवाडीचे ग्रामस्थ, शैक्षणिक,सामाजिक,साहित्य व राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी प्रा.मुकुंद वलेकर यांचे अभिनंदन केले आहे.

# ओबीसी बचाव परिषदेतील ठरावांना सरकार गांभीर्याने घेणार

## १७ ठरावाची प्रत देताना राज्य सरकारची ग्वाही

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

विदर्भवादी ओबीसी नेते डॉ. अशोक जीवतोडे यांनी ओबीसीतील जात संघटनांच्या प्रतिनिधींसह सोमवारी (दि.१८) ला चंद्रपुरात रविवारी (दि.१७) ला पार पडलेल्या ओबीसी बचाव परिषदेतील १७ महत्त्वपूर्ण ठरावांची प्रत राज्य सरकार कडे सादर केली. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, ओबीसी नेते छगन भुजबळ यांना ठरावाची प्रत देण्यात आली.ओबीसी बचाव परिषदेत विविध समाजातील प्रतिनिधींने एकत्र येऊन घेतलेल्या ठरावांना राज्य शासन गांभीर्याने घेतील, अशी राज्य सरकारने ग्वाही दिली.ओबीसी बचाव परिषदेतील ठरावांची प्रत देताना डॉ. जीवतोडे यांच्यासोबत ओबीसीतील तेली, माळी, कुणबी, नाभिक, धनगर व इतर आदी अनेक जातसमूहाचे प्रतिनिधी आदींचा समावेश होता.ठरावांमध्ये ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागू नये, बिहारच्या धरतीवर ओबीसी संवर्गाची जातनिहाय जनगणना सर्व्हे करावा, या प्रमुख मागणीसह अन्य मागण्यांचा समावेश होता.

**हे आहेत ओबीसींबाबतचे महत्त्वपूर्ण ठराव :**

ओबीसी आरक्षणाला धक्का लावू नये. मराठ्यांना स्वतंत्र आरक्षण द्यावे.


मराठ्यांना सरसकट कुणबी प्रमाणपत्र देऊ नये.

बिहारच्या धर्तीवर ओबीसींची जातनिहाय जनगणना व्हावी. देशभरात ओबीसींना २७ टक्के आरक्षण द्यावे.

देशात ओबीसींना लोकसंख्येच्या प्रमाणात किंवा सत्तावीस टक्के राजकीय आरक्षण लागू करावे.

वनहक्क पट्ट्यासाठी तीन पिढ्यांची अट रद्द करावी.

ओबीसीतील कमकुवत जातींसाठी विदर्भ, मराठवाडा व इतर महाराष्ट्रासाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करावे.शेतकरी, शेतमजूर यांना वयाच्या ६० वर्षांनंतर पेन्शन लागू करा, राज्य सरकारी कर्मचारी, शिक्षक आदींना जुनी पेन्शन योजना लागू करावी



ओबीसी बचाव परिषदेनंतर मंगळवारी (दि.१९) ला राज्य शासनाने नागपूर अधिवेशनात ओबीसींबाबत अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. मान. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सभागृहात माहिती दिली. ओबीसी परिषदेतील काही मागण्यांचा यामध्ये समावेश आहे. ओबीसींसाठी अनेक घोषणा करण्यात आल्या, ७ हजार २०० ओबीसी विद्यार्थ्यांना मदत, ओबीसी वर्गासाठी आधार योजना, सावित्रीबाई शिष्यवृत्ती योजनेत ३ ते ४ पट वाढ, सारथी आणि बारटी साठी प्रत्येकी ३०० कोटी, महाज्योतीसाठी ५५० कोटी, सारथी मार्फत ३५ हजार २६ रोजगार, स्वयंरोजगाराच शिक्षण, धनगर समाजासाठी १४० कोटींची तरतूद, धनगर समाजासाठी दहा हजार घरे बांधणार, आदी अनेक घोषणा व निर्णय घेण्यात आले. राज्य शासनाच्या या निर्णयाचे ओबीसी बचाव परिषदेच्या वतीने स्वागत करतो.

– डॉ. अशोक जीवतोडे
विदर्भवादी ओबीसी नेते

# घुग्घूस नगरपरिषदचे नाव प्रधानमंत्री आवास (शहरी) योजनेमध्ये समाविष्ट करा – आ.किशोर जोरगेवार

**चंद्रपूर । प्रतिनिधी.**

५० ते ६० हजार लोकवस्ती असलेल्या घुग्घूस नगर परिषदेचे नाव प्रधानमंत्री आवाज योजनेच्या सॉफ्टवेअरमध्ये नसल्याने येथील नागरिकांना सदर योजनेच्या लाभापासून वंचित राहावे लागत आहे. त्यामुळे शासनाच्या वतीने घूग्घूस नगर परिषदेचे नाव प्रधानमंत्री आवाज योजनेत समाविष्ट करण्यात यावे अशी मागणी आमदार किशोर जोरगेवार यांनी अधिवेशनात बोलतांना केली आहे.घुग्घूस शहराच्या विकासासाठी आमदार किशोर जोरगेवार यांच्या वतीने सातत्याने प्रयत्न सुरु आहे. या भागाच्या प्रलंबीत विकासकामांसाठी विविध विभागाअंतर्गत मोठा निधी त्यांनी उपलब्ध करुन दिला आहे. यातील अनेक कामे प्रगतीपथावर आहेत तर काही कामे प्रस्तावीत आहे. चंद्रपूर जिल्ह्याअंतर्गत घुग्घूस गावातील वाढती लोकसंख्या व जलद गतीने नागरीकरण यामुळे ग्रामपंचायतचे रूपांतर करून दिनांक ३१.१२.२०२० रोजी नवनिर्मीत घुग्घूस नगरपरिषदेची स्थापना करण्यात आली आहे. घुग्घूस शहर हे चंद्रपूर जिल्ह्यातील एक औद्योगिक नगर असून येथे मोठ्या प्रमाणात कोळसा खाणी, लोह शुद्धीकरण



प्रकल्प, सिमेंट कारखाने आहे. त्यामुळे येथे मोठ्या प्रमाणात मजूर वर्ग व कमी उत्पन्न गटातील नागरिक वास्तव्यास आहे. बहुतांश नागरिकांकडे पक्के घरे नाहीत. त्यातच प्रधानमंत्री आवास (शहरी) योजनेमध्ये घुग्घूस नगरपरिषदेचे नाव अद्यापही समाविष्ट करण्यात आले नाही.त्यामुळे घरकुल योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना हक्काच्या पक्या घरापांसून वंचित राहावे लागत आहे. सद्यास्थितीत नगर परिषद घुग्घूस येथे प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत ४५० पेक्षा अधिक लाभार्थ्यांचे ऑफलाईन पद्धतीने नोंदणी करण्यात आली आहे. मात्र सदर योजनेच्या सॉफ्टवेअरमध्ये घुग्घूस नगर परिषदेचे नाव नसल्याने लाभार्थ्यांना योजनेपासून वंचित राहावे लागत आहे. ही बाब लक्षात घेता केंद्र शासनाच्या महत्त्वाच्या प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना घरकुल मिळण्यासाठी घुग्घूस नगर परिषदचे नाव प्रधानमंत्री आवास (शहरी) योजनेमध्ये समाविष्ट करण्यात यावे अशी मागणी आमदार किशोर जोरगेवार यांनी अधिवेशनात बोलतांना केली आहे.यावेळी बोलतांना त्यांनी राज्य सरकार मोदी आवास योजना राबवित आहे. याबदल सरकारचे अभिनंदन केले. यावर बोलताना ते म्हणाले कि सदर योजने अंतर्गत ३ ते १० लाख घरे बांधण्याचा संकल्प सरकारने केला आहे. मात्र प्रधानमंत्री आवास योजनेतील पात्र लाभार्थ्यांची घरे मोदी आवाज योजनेत जात आहे. मात्र या योजनेत जात प्रमाणपत्राची अट आहे. त्यामुळे ६० ते ८० वर्षांच्या वयोवृध्दांना सदर जात प्रमाणपत्र काढण्यात अडचणी येत आहे. त्यामुळे या योजनेतून ६० ते ८० या वयातील वयोवृध्दांसाठी सदर अट रद्द करण्यात यावी अशी मागणी आमदार किशोर जोरगेवार यांनी केली आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय सेवा महाविद्यालयात संत गाडगे महाराज पुण्यतिथी साजरी

**वरोरा । प्रतिनिधी.**

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय सेवा महाविद्यालय सूर्ला वरोरा येथे संत गाडगे महाराज यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.दिनकर गुरनुले होते. याप्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छतेबद्दल मार्गदर्शन केले .तसेच प्रा. विनोद कोरडे ,प्रा. दिपक खामनकर , प्रा. मनोज खंडाळकर, प्रा. पाटील मॅडम यांनी विद्यार्थ्यांना गाडगे महाराज यांच्या जीवनावरील विविध प्रकारची माहिती दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयाची विद्यार्थिनी अश्विनी हजारे तर आभार प्रदर्शन पोर्णिमा मेश्राम यांनी केले. तसेच तुषार कडू व रमेश जीवतोडे यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी सहकार्य केले.




सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .